# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांची नॅक कार्यकारी परिषदेच्या सदस्यपदी निवड
### कुलगुरुंच्यारुपाने अमरावती विद्यापीठाचा राष्ट्रीयस्तरावर सन्मान

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष व नॅकच्या जनरल कॉऊन्सिलचे अध्यक्ष प्रो.डॉ.डी.पी. सिंह यांनी राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती (नॅक) च्या सर्वोच्च कार्यकारी समितीच्या सदस्यपदी तीन वर्षाच्या कार्यकाळासाठी करण्यात आली आहे. कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांची नॅकच्या सर्वोच्च कार्यकारी समितीवर सन्माननीय सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल आणि त्यांच्यारुपाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीयस्तरावर सन्मान मिळाल्याबद्दल प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, आय.आय.एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले तसेच विद्यापीठाचे विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विविध प्राधिकारिणींच्या सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

निवडप्रसंगी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, नॅक ही देशपातळीवर गुणवत्तेच्या आधारावर शिक्षणपद्धती प्रस्थापित करणारी संस्था आहे. शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा उंचावण्याचे काम सातत्याने नॅक संस्थेकडून होत आहे. त्या मुख्य संस्थेच्या कार्यकारी परिषदेवर निवड झाल्याबद्दल सर्वांना त्यांनी धन्यवाद दिले. कार्यकारी परिषदेचा सदस्य या नात्याने देशपातळीवर शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी धोरण ठरविणे व अनुषंगीक निर्णय प्रक्रियेमध्ये मी जास्तीतजास्त योगदान देण्याचा प्रयत्न करीन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी कुलगुरु म्हणून दोन वर्षांमध्ये विद्यापीठात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेवून विद्यापीठाच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. कौशल्य विकास अभ्यासक्रम, रोजगार, परीक्षांचे निकाल, विद्यार्थी कल्याणार्थ विविध योजना, पाच नवीन शैक्षणिक विभाग, विद्यापीठ परिसरात विविध विभागांच्या इमारतींचे निर्माणकार्य, वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, यांसह अनेक विद्यार्थीहितार्थ योजना व विकास त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाला आहे.

यापूर्वी त्यांची इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, रोहतकच्या गव्हर्निंग कॉऊन्सिल मंडळावर सदस्य, शिक्षक व इतर शिक्षकेत्तर पदांसाठी शैक्षणिक पात्रता आणि उच्चशिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी यु.जी.सी. द्वारा गठित समितीचे सदस्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य रुसा परिषदेचे सदस्य, वाय.सी.एम.ओ.यु., नाशिकच्या व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद आणि नियोजन, परीक्षा मंडळाचे सदस्य, राज्यपालद्वारा नामित मुंबई विद्यापीठाचे अधिसभा सदस्य, वाय.सी.एम.ओ.यु., नाशिकच्या परिनियम व अध्यादेश समितीचे अध्यक्ष, परीक्षा सुधारणा समितीचे सदस्य, महाराष्ट्र शासनाच्या टास्क फोर्स समितीचे अध्यक्ष या महत्वपूर्ण संस्थांवर शासनाने त्यांची निवड केली असून त्या माध्यमातून भारतातील शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांचे अनुभव आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले आहेत. श्रीलंका, सिंगापूर या देशाचा दौरा त्यांनी केला असून अनेक नामांकित पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

विद्यापीठाला बांबू प्रशिक्षण केंद्र, नॅशनल रिसोर्स सेंटर, ट्रायबल डेव्हलपमेन्ट सेंटर यासह रुसा व शासनाकडून कोट्यावधी रुपयांचे अनुदान सुद्धा विद्यापीठाला त्यांच्या कार्यकाळात प्राप्त झाले आहे. त्यांच्या नियुक्तीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीयस्तरावर बहुमान मिळाला असून कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०४/०७/२०१८.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी